प्रति,　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　दिनांक : . .२०२०

माननीय जिल्हाधिकारी/तहसीलदार,

**विषय : प्रजासत्ताकदिनी राष्ट्रध्वजाचा होणारा अवमान रोखण्यासाठी न्यायालयाच्या आदेशानुसार, तसेच राज्य शासनाच्या प्लास्टिक बंदीच्या निर्णयानुसार कार्यवाही करण्याविषयी ....**

महोदय,

राष्ट्रध्वज म्हणजे राष्ट्राची अस्मिता ! मात्र दुर्दैवाने याचे स्मरण केवळ १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी या दिवशीच बहुतांश भारतियांना होते आणि यादिनी राष्ट्रध्वज मोठ्या अभिमानाने मिरवले जातात. हेच कागदी/प्लास्टिकचे छोटे राष्ट्रध्वज त्याच दिवशी सायंकाळपासून रस्त्यावर, कचऱ्यात, गटारात आदी ठिकाणी पडलेले आढळतात. प्लास्टिकचे ध्वज लगेच नष्ट होत नाहीत. त्यामुळे अनेक दिवस या राष्ट्रध्वजांची विटंबना पाहावी लागते. राष्ट्रध्वजाची अशाप्रकारे होणारी विटंबना रोखण्यासाठी हिंदु जनजागृती समितीच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका (१०३/२०११) दाखल केली होती. याविषयी सुनावणी करतांना न्यायालयाने प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजाद्वारे होणारा अवमान रोखण्यासाठी शासनाला आदेश दिले आणि त्यानुसार केंद्रीय अन् राज्य गृह विभाग, तसेच शिक्षण विभाग यांनी याविषयीचे परिपत्रकही काढले. महाराष्ट्र शासनाने राज्यात 'प्लास्टिक बंदी'चा निर्णय घेतला आहे. त्यानुसारही प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजांची विक्री करणे, हेदेखील कायद्याच्या कचाट्यात येते.

उच्च न्यायालयाने विशेषतः शासनाला 'राष्ट्रध्वजाचा अवमान रोखण्यासाठी कृती समिती स्थापन करावी आणि त्यामध्ये सामाजिक संस्थांना सामावून घ्यावे', असेही आदेश दिले आहेत. यामध्ये प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजाद्वारे होणारा अवमान रोखण्यासाठी विविध माध्यमांतून जनजागृती करणे अभिप्रेत आहे. (उदा. पत्रके, फलक, विज्ञापने यांद्वारे प्रबोधन) समिती गेल्या १८ वर्षांपासून राष्ट्रध्वजाच्या अवमानाच्या विरोधात राष्ट्रकर्तव्य म्हणून प्रबोधन करत आहे. समितीद्वारे शाळा-महविद्यालयांत व्याख्याने घेणे, प्रश्नमंजुषा घेणे, हस्तपत्रके वितरित करणे, भित्तीपत्रके-फ्लेक्स लावणे, स्थानिक केबल वाहिन्यांवर ध्वनीचकत्या (सीडी) दाखवणे, रस्त्यांवर पडलेले राष्ट्रध्वज गोळा करणे, सामाजिक संकेतस्थळाद्वारे मोहीम राबवणे आदी कृती या उपक्रमाच्या अंतर्गत करण्यात येतात.

*** या संदर्भात आमच्या खालील मागण्या आहेत –**

१. शासनाने न्यायालयाच्या आदेशानुसार राष्ट्रध्वजाचा अवमान रोखण्यासाठी प्रबोधन करणारी कृती समिती स्थापन करावी. त्यामध्ये हिंदु जनजागृती समितीचाही समावेश करावा, अशी विनंती आहे. समिती या राष्ट्रसेवेस तत्पर आहे. (यापूर्वी भिवंडी आणि जळगाव या ठिकाणी अशी कृती समिती स्थापण्यात आली असून त्यामध्ये समितीच्या प्रतिनिधींना सहभागी करून घेतले आहे.)

२. जिल्ह्यात कुठेही प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजाचे उत्पादन आणि विक्री होते का ?, याची खात्री करावी. असे होत असल्यास संबंधित उत्पादकांवर त्वरित कारवाई करण्यात यावी.

३. समितीला शाळांतून 'राष्ट्रध्वजाचा सन्मान राखा !' या विषयावर व्याख्यान अन् प्रश्नमंजुषा घेण्यास अनुमती द्यावी.

४. नागरिकांचे प्रबोधन व्हावे, यासाठी समितीने 'राष्ट्रध्वजाचा सन्मान राखा !' ही विशेष चित्रफित बनवली आहे. ही चित्रफित चित्रपटगृहे आणि केबल वाहिन्या यांना दाखवण्यास अनुमती द्यावी, ही विनंती !

आपला विश्वासू,